## हस्तपुस्तिका क्रं.1

## संस्थेची संरचना व इतिहास

भारतीय संघराज्याची आर्थिक व वाणिज्य राजहानी म्हणजेच मुंबई महानगर हे मुंबई शहर जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा अश्या दोन महसुली जिल्हयात विभागलेले आहे. या महानगराचे एकूण क्षेत्रफळ 437.71 कि.मी. असून इ.स.2014 च्या मध्यवर्ती गणनेनुसार12584139 (बारा दशलक्ष) म्हणजेच महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या 12.37% लोकसंख्येस या शहराने आश्रय देवून सामावून घेतलेले आहे. एवढेच नव्हे तर जवळच्या जिल्हांमधून किंवा इतर राज्यातून येणा-या विस्थापितांच्या लक्षणीय लोकसंख्येचे व्यवस्थापन देखील हे शहर करत आहे.

बेटसद्दश्य भौगोलिक संरचनेमुळे मानवनिर्मित व नैसर्गिक अशा अनेविधी आपत्तींना या शहरास सामोरे जावे लागते. उपजिविकेसाठी विविध मार्गाच्या व साधनांच्या उपलब्धतेमुळे देशाच्या विविध भागातून लोक येथे येऊन स्थायिक होतात. या महानगरातील वीज पुरवठा, पाणी पुरवठा, दळणवळणाची साधने, उदा. रस्ते, लोहमार्ग, विमानतळ इत्यादी सारख्या पायाभूत सुविधा उत्कृष्ट दर्जाच्या आहेत.

देशाच्या विविध भागातून येथे येणा-या तात्पुरत्या विस्थापितांच्या लक्षणीय प्रमाणामुळे देखिल येथिल पायाभूत सुविधांवर अतिरिक्त ताण पडत असतो. अणुउर्जा केंद्र, पेट्रोरसायनांचे कारखाने, अंतरदेशीय व अंतरराष्ट्रीय विमानतळ, बंदरे हे शहरात मोक्याच्या ठिकाणावर स्थित असल्याने आगीच्या धोक्यांचे गांर्भिय वाढलेले आहे. बेटसद्दश्ये भौगोलिक रचनेमुळे शहराच्या जमिनी समांतर विस्तारास नैसर्गीक मर्यादा येतात व त्यामुळे उत्तुंग इमारतींद्वारे येथिल विस्तार व विकास साधला जात आहे. उत्तुंग इमारतींची संख्या या शहरात जास्त असून 60 मिटसर्सच्या पेक्षा उंचीच्या इमारती या अग्निशमन दला करिता आव्हानत्मक आहेत.

मुंबई महापालिका अधिनियम 1888, प्रकरण-3, भाग 61 (के) नुसार आगीपासून नागरीकांच्या जिवित्ताचे व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी अग्निशमन सेवा पुरविणे हे महापालिकेचे बंधनकारक कर्तव्य आहे आणि त्यानुसार सर्व प्रकारच्या आणिबाणी प्रसंगी अत्यावश्यक सेवा पुरविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका अग्निशमन दल विभाग परिरक्षीत करते. त्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका पुरेसे मनुष्यबळ, अत्याधुनिक शिड्या आणि इतर अत्याधुनिक व प्रगत जीवसंरक्षक साधनांसाठी अर्थसंक्लपीय तरतुदी करते. विविध शिर्षाद्वारे भरीव आर्थिक तरतुद अर्थसंकल्पात महापालिकेने केलेली आहे.

### पूर्व इतिहास :

शासकिय पोलिसांच्या अंशंत: कर्तव्याचा भाग म्हणून सुरु करण्यात आलेला "अग्निसुरक्षा" हा विषय 1 एप्रिल 1888 पासून पूर्णत : महापालिकेच्या अखत्यारित आला. इ.स.1980 ते 1947 पयर्यंत दलाचे अधिपत्य लंडन अग्निशमन दलाच्या प्रतिनियुक्त अधिका-यांद्वारे केले जात होते. स्वातंत्रा नंतर इ.स.1948 पासून मात्र दलाचे अधिपत्य व नियंत्रण पूर्णपणे भारतीयांद्वारे केले जाऊ लागले.

पूर्वी हातपंप, घोड्याद्वारे ओढले जाणारे बाष्पयंत्र ही अग्निशमनाची साधने होती. या बाष्पयंत्राच्या आणि पूर्वी वापरल्या जाणा-या बंबाच्या आकार सांधर्म्यामुळे दल अस्तित्वात आल्यापासून या दलास आजदेखील "बंब खाना" या एतदेशिय संबोधनाने संबोधण्यात येते.

आजमितीस बृहनमुंबईत 34 अग्निशमन केंद्रे कार्यरत असून भायखळा येथे शहर मुख्यालय व मरोळ येथे उपनगर मुख्यालय आहे.

अग्निशमन दलाच्या प्रमाणभूत कार्यप्रणाली नुसार सद्या मुंबई अग्निशमन दलात सहा प्रादेशिक समादेश केंद्रात विभागणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक प्रादेशिक समादेश केंद्राचे प्रमुख, उप.प्रमुख अग्निशमन अधिकारी आहेत. प्रत्येक समादेश केंद्रास पुन्हा विभाग व उपविभाग विभागलेले असून त्यांचे नियंत्रण विभागीय अग्निशमन अधिकारी व सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी करतात. प्रत्येक अग्निशमन केंद्राचे प्रमुख केंद्र अधिकारी असतात.

मुंबई अग्निशमन दलाचे मध्यवर्ती नियंत्रण कक्ष भायखळा येथे असून विभागीय अग्निशमन अधिकारी (दळणवळण) हे त्यास जबाबदार असून त्यांच्या अधिपत्याखालील नियंत्रण कक्ष जवळजवळ 2700 अधिकारी व कर्मचारी आणि 200 वाहने यांचे नियंत्रण करते. मुंबई अग्निशमन दलातील अधिकारी 24 तास पाळी पध्दती व कर्मचारी वर्ग 8 तास पाळी पध्दतीत काम कारतात. ते सर्व प्रकारच्या आणीबाणी करिता 24 तास दक्ष असतात. आणीबाणीच्या प्रसंगांना तोंड देतानांच अग्निशमन दलाचे जवान व अधिकारी अग्निकवायत व विमोचनाचा सराव व अग्निप्रतिबंध व अग्निसुरक्षा विषयक तपासण्या त्याचप्रमाणे वाहनांची व साहित्याची देखभाल देखिल करतात.

# त्यागाची श्रृंखला

14 एप्रिल 1944 रोजी मुंबई पोर्ट ट्रस्टच्या तत्कालीन व्हीक्टोरीया डॉक मधील क्रमांक 1 च्या धक्कयावर नांगरलेल्या एस.एस.फोर्ट स्टीकीन या जहाजामध्ये दारुगोळा, कापड, तेलाचे डब्बे, सोने, चांदी इत्यांदी माल भरलेला होता. या जहाजामध्ये लागलेल्या आगीमुळे एकापाठोपाठ एक असे महाभयंकर स्फोट झाले. त्यामूळे संपूर्ण डॉक परिसर आणि जवळील नागरी वसाहतींमध्ये जवळजवळ एक मैलापेक्षा जास्त परिसर आगीच्या ज्वालांनी व्यापलेला होता. आगीतून बाहेर पडणारा प्रचंड काळा धुर व आगीच्या लोळांनी संपूर्ण परिसर व्यापून गेला होता. संपूर्ण परिसरात प्राणी व माणसे यांचे मृतदेह पडले होते. अशा या दुर्धर प्रसंगी मुंबई अग्निशमन दलाच्या अधिकारी व जवानांनी आव्हानाला अग्निशमनाच्या मार्गात येणा-या अडथळे व अडचणीमुळे न डगमगता धिरोदांतपणे तोंड दिले. दलाच्या अधिका-यांनी व जवानांनी आपली कर्तव्य प्रति असलेली निष्ठापनाला लावून, दृढतेने शौर्यंची शर्थ करत त्या महाप्रचंड आगीचा सामना केला.

जवळ जवळ एक महिना अग्निशमनाचे काम चालू होते. अग्निशमन दलाचे 66 अधिकारी व कर्मचारी या ठिकाणी आपले कर्तव्य बजावत असतांना धारातीर्थी पडले व अग्निशमन दलाचे नांव उज्वल करुन गेले. काही जवानांना कायमस्वरुपी अपंगत्व आले. तसेच दलाची काही वाहने व साधने नष्ट झाली व काही नादुरुस्त झाली.

| अनु क्र. | खाते / संस्था नांव | मृत किंवा न सापडलेले | जखमी |
|---|---|---|---|
| 1 | आर्म पर्सोनेल | १५ | ३० |
| 2 | बॉम्बे फायरन बिग्रेड सर्व्हिसेस | ६६ | ८३ |
| 3 | बॉम्बे पोलीस | १४ | ५५ |
| 4 | बॉम्बे पोर्ट ट्रस्ट | ८४ | माहित नाही |
| 5 | नेव्हल पर्सोनेल | ०७ | १६० |
| 6 | इतर | ०४ | २५ |
| 7 | जहाजावरील कर्मचारी | ४१ | १२३ |

अशा या भिष्ण आपत्तिस तोंड देताना हौतात्म्य पत्करलेल्या अधिकारी व जवानांची स्मृती म्हणून मुंबईच्या नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने लोक वर्गणीतून निधीसंकलन करुन अग्निशमन दलाचे मुख्यालय असलेल्या भायखळा येथे स्मृती-स्थंभ उभारला आहे. भारत सरकार तर्फे 14 एप्रिल हा दिवस अग्निशमन सेवा दिन म्हणून संपूर्ण देशभर साजरा केला जातो.

Organization Set-up

मा. महानगरपालिका आयुक्त

↓

अति. महानगरपालिका आयुक्त

↓

उप महानगरपालिका आयुक्त

↓

प्रमुख अग्निशमन अधिकारी

↓

| COMMAND-1 | COMMAND-2 | COMMAND-3 | COMMAND-4 | COMMAND-5 | COMMAND-6 | |
|---|---|---|---|---|---|---|
| उप प्र.अ.अ. | उप प्र.अ.अ. | उप प्र.अ.अ. | उप प्र.अ.अ. | उप प्र.अ.अ. | उप प्र.अ.अ. | उपप्र.अ.(तां) |
| भायखळा | वडाळा | मरोळ | बोरीवली | मानखुर्द | विक्रोळी | |

उप प्र.अ.अ. (प्रशिक्षण) (एकूण 7 उप प्रअअ व 1 उप प्रअ(तां))

↓

विभागीय अग्निशमन अधिकारी (11)

↓

सहा. विभागीय अग्निशमन अधिकारी (16)

↓

केंद्र अधिकारी (54)

↓

सहा. केंद्र अधिकारी (212)

↓

दुय्यम अधिकारी(66)

↓

यंत्रचालक (483)

↓

प्रमुख अग्निशामक (243)

↓

अग्निशामक (1686)

प्रमुख अग्निशमन अधिकारी

मुंबई अग्निशमन दल